महाराष्ट्र शासन

**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई**

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र. संवैशिवसं/नीट पीजी - २०१८/निवड यादी/सूचना/२०१८/१-अ, दिनांक २६/०४/२०१८.

प्रति,
अधिष्ठाता/ प्राचार्य,
१) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये महाराष्ट्र राज्य
२) सर्व ब्रृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, मुंबई
३) खाजगी वैद्यकीय महाविद्यालये महाराष्ट्र राज्य
४) महात्मा गोधी इंन्स्ट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस, सेवाग्राम, वर्धा

**विषय:- नीट पीजी - २०१८ प्रथम फेरी सुधारित प्रवेश प्रक्रियेसंबंधाने महत्वाच्या सूचना..**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे सन २०१८ -१९ या शैक्षणिक वर्षाकरीता राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, सर्व ब्रृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, मुंबई, सर्व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये यामधील पदव्युत्तर व पदविका अभ्याक्रमाच्या प्रवेशाकरीता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेच्या अनुषंगाने राज्य स्तरीय कोटयाची प्रथम निवड यादी दिनांक ०५ एप्रिल, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु, काही खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी संस्थास्थरावरील कोटयासाठी वाढीव फि चे कारणास्तव त्यांचे महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना रुजू करुन घेतले नाही. परंतु, आता फी वाढीचा प्रश्न शिक्षण शुल्क समिती कडून मान्य झाल्यामुळे प्रथम फेरीची सुधारित यादी दिनांक २७/०४/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

आपल्या वैद्यकीय महाविद्यालय/ संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता नीट पीजी २०१८ च्या सुधारित गुणवत्ता यादीनुसार आणि उमेदवारांच्या पात्रतेनुसार राज्यस्तरीय कोटा/ संस्थास्तरावरील कोटा व एनआरआय कोटासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशास निवड झालेल्या उमेदवारांची ०५/०४/२०१८ रोजीची आपणांस पाठविलेली यादी प्रथम सुधारित यादी म्हणून ग्राह्य धरण्यात यावी.

१) आपल्या संस्थेतील ३ जबाबदार अधिकाऱ्यांची समिती उमेदवारांच्या मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याकरीता गठीत करुन समितीमार्फत आवश्यक त्या सर्व मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात यावी. सदर समिती सदस्यांची नावे या कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत. मुळ प्रमाणपत्राची तपासणी झाल्यानंतरच प्रवेश प्रक्रियेची पुढील कार्यवाही करावी.

मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करताना खालील गोष्टी प्रामुख्याने विचारात घेण्यात याव्यात.

- महाराष्ट्र शासन/ महानगरपालिका, वैद्यकीय महाविद्यालयामधून उत्तीर्ण झालेल्या आणि ३१ मार्च, २०१६ पर्यंत अंतरवास पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी बंध पत्र

मुक्त प्रमाणपत्र अत्यावश्यक आहे. सदर उमेदवारांकडे बंधपत्र मुक्त प्रमाणपत्र नसल्यास नीट पीजी - २०१८ चे प्रवेश प्रक्रियेव्दारा प्रवेश देण्यात येवू नये.

- संविधानीक राखीव असलेल्या जागांवर (SC/ST/VJ/NT1/NT2/NT3/OBC) निवड झालेल्या उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (VJ/NT1/NT2/NT3/OBC प्रवर्गासाठी दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत वैध्र असेल) अत्यावश्यक आहे. अशा उमेदवारांना सदर मुळ प्रमाणपत्रांशिवाय प्रवेश देण्यात येवू नये.

२) सर्व प्रमाणपत्रांच्या तपासणी अंती निवड झालेल्या पात्र उमेदवारांकडून आपल्या महाविद्यालयात/ संस्थेत प्रवेशासाठी शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क दिनांक २७ एप्रिल, २०१८ ते २९ एप्रिल, २०१८ (दिनांक २७, २८ आणि २९ एप्रिल, २०१८ हे तीनही दिवस) स्विकारण्यात यावेत.

३) शैक्षणिक शुल्क हे डिमांड ड्राफट च्या स्वरुपात स्विकारण्यात यावे. सदर डिमांड ड्राफट हे अंतिम फेरीतील प्रवेश कायम होईपर्यंत कोषागार/ बँकेमध्ये भरण्यात येवू नये. जेणेकरुन उमेदवारास प्रवेश बदलून मिळाल्यास किंवा उमेदवाराने विहीत मुदतीत प्रवेश रद्द केल्यास त्योचेकडून रुपये १,५००/- (रुपये एक हजार पाचशे फक्त) रोख घेवून शैक्षणिक शुल्कापोटी घेण्यात आलेला डिमांड ड्राफट तात्काळ परत करणे शक्य होईल. उमेदवारांना रुजू होण्याचा काळ हा अत्यंत कमी असल्याने आणि त्या दरम्यान बॅक बंद असल्याने, शैक्षणिक शुल्क तात्पुरते धनादेशाच्या स्वरुपात स्विकारुन प्रवेश देण्यात यावा.

४) खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील एनआरआय कोटयातील प्रवेशासाठी येणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक शुल्क व इतर फी हे आयकर विभागाचे नियमांचे अधिनस्त राहुन आरबीआय च्या मानकानुसार स्विकारण्यात यावेत.

५) प्रवेश शुल्क भरणाऱ्या सर्व उमेदवारांना शक्य तितक्या लवकर वैद्यकीय पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रमासाठी निवासी पदावर रुजू होण्याच्या सूचना देण्यात याव्यात. सदर उमेदवारांचे शैक्षणिक सत्र मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये दिनांक १ मे २०१८ पासून चालु होत आहेत. परंतू १ मे २०१८ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त शासनाची सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे, दिनांक २ मे, २०१८ पासून निवासी पदावर रुजू होण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

६) आपल्या महाविद्यालयात उपरोक्त मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जर पुढील निवड फेरीत अन्य महाविद्यालयात प्रवेश बदल नको असल्यास, अशा विद्यार्थ्यांसाठी संचालनालयामार्फत देण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमध्ये स्टेटस रिटेन्शन फॉर्म देण्यात आला आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना पुढील निवड फेरीत प्रवेश नको असल्यास अशा विद्यार्थ्यांना दिनांक २९ एप्रिल, २०१८ पर्यंत ही सुविधा द्यावी.

विद्यार्थ्यांस जर पुढील फेरीसाठी पात्र व्हायचे असेल तर त्याने स्टेटस रिटेन्शन फॉर्म भरु नये. विद्यार्थ्याने निवड प्राप्त झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि

रिटेन्शन फॉर्म भरला नाही तरच तो पुढील फेरीमधील बदलांकरीता पात्र ठरतो. तरी आपणांस कळविण्यात येते की, विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात स्टेटस रिटेन्शन फॉर्म सादर करावयास आल्यावर त्याला उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सूचित करावे व त्यानंतरच त्याच्याकडून स्टेटस रिटेन्शन फॉर्म भरुन घ्यावा. तसेच जे विद्यार्थी स्टेटस रिटेन्शन फॉर्म सादर करणार नाहीत त्यांना पुढील प्रत्येक प्रवेश फेरीच्या वेळी त्यांच्या प्रवेशामध्ये बदल झाला आहे अथवा नाही. याबाबत खातरजमा करुन घेण्याबाबतचा सूचना द्याव्यात.

७) सदर पत्रासोबत भारतीय आयुविज्ञान परिषदेमार्फत अंतिम मान्यता प्राप्त न झालेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमावर प्रवेशित उमेदवारांकडून प्रवेशाचे वेळी तशा आशयाचे अंडरटेकिंग भरुन घ्यावे. त्या अनुषंगाने भारतीय आयुविज्ञान परिषदेची अंतिम मान्यता प्राप्त झालेली नसल्यास परंतू परवानगीने सुरु करण्यात आलेल्या (Approved/Permitted Under Section 10-A) आपल्या महाविद्यालयातील त्या विषयातील सर्व जागेवर प्रवेश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांकडून अंडरटेकिंग व्दिप्रतीत भरुन घेण्यात यावे.

८) आपल्या महाविद्यालयातील रुजू झालेले/ रुजू होऊन प्रवेश रद्द केलेल्या उमेदवारांची नोंद, या कार्यालयातर्फे पुरवण्यात आलेल्या यादीमध्ये करावी. त्याचप्रमाणे स्टेटस रिटेन्शन फॉर्म भरुन दिलेल्या उमेदवारांची नोंदही सदर यादीत करण्यात यावी. सदर यादी या कार्यालयास तात्काळ दिनांक २९ मे, २०१८ रोजी इमेल व्दारे/ हस्ते पाठविण्यात यावी (**dmercetcell@gmail.com**). त्याचप्रमाणे सदर माहिती कॉलेज फिडबॅक मॉडयुल मध्ये ऑनलाईन भरण्यात यावी.

अनुक्रमांक १ मध्ये कळविल्याप्रमाणे महाविद्यालयाच्या स्तरावर गठीत करण्यात येणाऱ्या समितीने पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंबंधाने संचालनालयामार्फत वारंवार देण्यात येणाऱ्या सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करणे अनिवार्य आहे. त्यामुळे सदर समितीतील सदस्य हे पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत समितीत कार्यरत राहतील याची नोंद घ्यावी. पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाची वर नमूद केलेली कार्यवाही, अत्यंत संवेदनशील स्वरुपाची असल्यामुळे बिनचूक कार्यवाही होणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेची आणि प्रक्रियेच्या नियमावली पुस्तिकेची प्रत सोबत आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडण्यात येत आहे.

संचालक
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन,**
**मुंबई**

प्रत,

१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

२) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई